**प्रेसनोट**

बुलडाणा
दिनांक 22.07.2021.

आडविहीर ता. मोताळा येथील रहिवासी पंकज श्रीकृष्ण फिरके हे हरीयाणा फरीदाबाद येथील एस्कॉर्ट लिमिटेड कंपनीच्या धुळे येथील शो रुममधील एक्सीकेटीव्ह पदावर नोकरी करतात त्यांचे भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा मोताळा येथील बँकेत बचत खाते असुन त्यांनी 5,00,000/- रुपयांची रक्कम मागील 10 वर्षापासुन मोताळा बँकेत फिक्स् डिपॉझिट केले असुन त्यांच्या रक्कमेचे व्याजासह 6,41,561/- रुपये झाले असतांना त्यांना धुळे येथुन कंपनीच्या कामासाठी दिनांक 03.12.2020 रोजी पुणे येथे जाणे आवश्यक असल्याने त्यांनी ऑनलाईन रेड बस ट्रॅव्हलस् एजंसी येथे प्रयमेश ट्रॅव्हलसचे दिनांक 05.12.2020 चे रात्रीचे टिकीट बुक केले परंतु त्यांचे तिकीट कन्फर्म न झाल्याने त्यांनी ट्रॅव्हलस् एजंसीसोबत संपर्क केला असता त्यांना गुगल अॅपवर जावुन ट्रॅव्हलस् एजंसीचा नंबर शोधुन फोन केला त्यावरुन तक्रारदार यांना परत फोन आला व सांगितले की तुमचे रेड बसचे टिकीट कॅन्सल करायचे असल्यास तुमच्या तिकीटचे डिटेल्स्, तिकीट क्रमांक, PNR नंबर पाठवा म्हणुन कळविण्यात आल्याने तक्रारदारयांनी त्याप्रमाणे कृती केली परंतु त्यांचे अकाउंटला तिकीटाचे पैसे परत आले नसल्याने त्यांना एनीडेस्क् अॅप डाऊनलोड करण्याचे सांगीतले त्याप्रमाणे पंकज फिरके यांनी अॅप डाउनलोड केले असता दि.05.12.2020 रोजी 20 मिनीटांचे कालावधीत त्यांचे एसबीआय शाखा मोताळा येथील बँकेत फिक्स् डिपॉजीट असलेल्या 6,41,561/- रु ची रक्कम त्यांचे बचत खात्यात जमा होवुन बचत खात्यातील 6,06,894/- रु चे विविध सात ट्रान्जीक्शनव्दारे अज्ञात इसमाने ऑनलाईन ट्रान्सपर केली त्यातील 86,999/- रु फिलपकार्ट तसेच 1,19,900/- रु रिलायन्स् डिजीटल वरुन अज्ञात इसमाने ऑनलाईन खरेदी केली तक्रारदार फिरके यांनी त्यांचे लॅपटापवरुन अचानक टान्सफर झालेल्या रकमेची विवरण चेक केले असता त्यांना त्यांची ऑनलाईन फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी सायबर पो.स्टे.बुलडाणा येथे येवुन झालेली घटना कळविल्याने सायबर पो.स्टे.कडुन तातडीने त्यांचे तक्रारीची दखल घेवुन 86,999/- रु तात्काळ फिर्यादीचे खात्यात रिफंड केली. त्यांनतर पंकज फिरके यांनी पो.स्टे.बोराखेडी येथे दि.07.12.2020 रोजी दिलेल्या रिपोर्टवरुन त्यांचेशी ऑनलाईन व्यवहार करणारा मोबाईलवरील अज्ञात व्यक्तीचे विरुध्द अप.नंबर 466/20 कलम 420 भादंवि सहकलम 66 क,ड माहीती तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत दाखल करण्यात आला सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधिक्षक बुलडाणा यांचे आदेशाने सायबर पोलीस स्टेशन बुलडाणा कडे वर्ग करण्यात आल्यानंतर सायबर पोलीसांनी तपासाची चक्रे फिरवुन तक्रारदार यांचे खात्याचे अकाउंट स्टेटमेंट चेक करुन त्यांचेशी ट्रॅव्हल एजंसीचे नावाखाली एनीडेक्स अॅप डाउनलोड करण्याची सुचना देणाऱ्या मोबाईल धारकाचा पोलीसांनी शोध घेवुन तक्रारदार यांची 6,06,894/- रु ऑनलाईन ट्रान्सपर करण्यासाठी ज्या 16 अकाउंटमध्ये रक्कम पाठविली त्यांचे सर्वांचे निश्चीत ठावठिकाणांचा शोध घेवुन अज्ञात संशयीत हे झारखंड पश्चिम बंगाल राज्यातील असल्याचे तपासात आढळुन आल्याने पोलीस अधिक्षक बुलडाणा यांचे आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक विलासकुमार सानप, पोलीस अंमलदार ज्ञानेश नागरे, पवन मखमले, कैलास ठोंबरे, अमोल तरमळे यांचे पोलीस पथक सदर ठिकाणी पाठविण्यात आले परंतु आरोपींना पोलीस आल्याचा सुगावा लागल्याने आरोपी त्यांचे घरातुन फरार झाले व त्यांचे मोबाइल बंद करुन टाकले परंतु तपास अधिकारी प्रदीप ठाकुर यांनी गुन्हा उघडकीस आनण्यासाठी तपास पथकास परत बोलावुन पुन्हा तांत्रीक तपास करावयास लावुन आरोपी नामे लुकमान अन्सारी इम्तीयाज आलम रा.पहरुडीह ता.पालाजोरी जिल्हा देवघर (झारखंड) हा सध्या डिलीसो सिरॅमीक, जेटपर रोड, शापर व्हिलेज ता.जि.मोरबी (गुजरात) राज्यात असल्याची उपयुक्त माहीती मिळुन आल्याने पुन्हा सहाय्यक पोलीस निरीक्षक विलासकुमार सानप, पोलीस अंमलदार ज्ञानेश नागरे, पवन मखमले, कैलास ठोंबरे, अमोल तरमळे यांचे पोलीस पथक गुजरात येथे पाठवुन नमुद आरोपीचा तांत्रीक माहीतीचे आधारे स्थानीक पोलीसांचे मदतीने गुन्हयात वापरलेल्या मोबाइल हॅंडसेटसह आरोपीस अटक करुन बोराखेडी पोलीस स्टेशन येथे आणुन हजर केले व आरोपीस न्यायालयापुढे पेश करुन पोलीस कस्टडी रिमांड घेतला आहे. अटक केलेल्या आरोपीकडुन त्याचे इतर साथीदारांचा शोध घेवुन तक्रारदार पंकज श्रीकृष्ण फिरके रा.आडविहीर यांचे फिक्स डिपॉजीट मधील ऑनलाईन ट्रान्सफर केलेली रक्कम आरोपीकडुन प्राप्त करण्यासाठी प्रयत्नाची शिकस्त करीत आहे. सदर गुन्हयाचा तपास मा.पोलीस अधिक्षक श्री अरविंद चावरीया, अपर पोलीस अधिक्षक बुलडाणा श्री बजरंग बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी प्रदिप ठाकुर पोलीस निरीक्षक सायबर पो.स्टे.बुलडाणा यांचे आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक विलासकुमार सानप, पोलीस अंमलदार ज्ञानेश नागरे, पवन मखमले, कैलास ठोंबरे, अमोल तरमळे यांनी आरोपी गुजरात येथुन अटक करण्यासाठी महत्वपुर्ण कामगीरी केली आहे.

(प्रदिप ठाकुर)
पोलीस निरीक्षक
सायबर पो.स्टे.बुलडाणा

